जावक क्रमांक :-४३३०/२०२०
विशेष शाखा, पिंपरी चिंचवड
दि. ३१.०७.२०२०.

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३) प्रमाणे दिनांक ०१.०८.२०२० चे ००.०१ ते दिनांक ३१.०८.२०२० चे २४.०० वा. पावेतोचा मनाई आदेश.**

१)ज्याअर्थी असे मानन्यास मला पुरेसे कारण आहे की, कोरोना संसर्गाच्या अनुषंगाने लॉकडाऊन घोषीत करण्यात आले आहे. सदर काळात काही समाज विघातक/गुन्हेगारी वृत्तीचे लोक, दोन समाजांमध्ये जातीय तेढ निर्माण होईल असे संदेश अथवा लोकांमध्ये संभ्रम निर्माण होईल.अशा अफवा/कोरोना बाधित व्यक्तींच्या संख्या, यांच्यावरील उपचार व त्यात बळी पडलेल्या रुग्णांची संख्या तसेच या विषाणुचा प्रादुर्भाव झालेला परिसर वा संशयित कोरोना बाधित व्यक्ती याबाबत कोणीही खातरजमा न करता माहिती/ बातमी सोशल मिडीया/विविध प्रसारमाध्यमांमध्ये पसरवत आहेत. त्यामुळे समाजात अकारण भिती उत्पन्न होत असल्याचे जाणवत आहे.

या संदेश /अफवा/बातमीमध्ये सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता आहे. अशा घटनांवर अंकुश ठेवण्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस उद्देशुन काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

२) त्याअर्थी मी **संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१)(३) प्रमाणे दिनांक ०१.०८.२०२० चे ००.०१ ते दिनांक ३१.०८.२०२० चे २४.०० वा. पर्यंत मनाई आदेश लागु करीत आहे.**

अ)जातीय वैमनस्य/धार्मिक तेढ/समाजात तिरस्कार निर्माण करण्या-या कोणत्याही स्वरुपाच्या अनाधिकृत /खोटया बातम्या तसेच कोरोना संबंधित अंधश्रध्दा आणि निराधार माहिती, कोणत्याही व्यक्ती, व्यक्तींचा समुह प्रसारित करणार नाही.

**ब**)सोशल मिडीया/ एसएमएस/ व्हॉट्सअॅप/ फेसबुक/ व्टिटर/ टिकटॉक/ हॅलो/ टेलीग्राम किंवा इतर कोणत्याही डिजीटल माध्यमांमध्ये दोन समाजात जातीय तेढ/ धार्मिक तेढ निर्माण होईल असे कोणतेही प्रक्षोभक आणि आक्षेपार्ह संदेश /साहित्य/चित्रफित इत्यादी कोणतीही व्यक्ती,व्यक्तींचा समुह प्रसारित करणार नाही.

**क**)सोशल मिडीया/ एसएमएस/ व्हॉट्सअॅप/ फेसबुक/ व्टिटर/ टिकटॉक/ हॅलो/ टेलीग्राम अथवा इतर कोणत्याही सोशल नेटवर्किंग प्लॅटफॉर्मचे ग्रुप अॅडमिन हे आपल्या ग्रुपमधील कोणत्याही प्रक्षोभक आणि आक्षेपार्ह संदेश /साहित्य/चित्रफित इत्यादी. वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील.

३)सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती अथवा समुह भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे तसेच इतर प्रचलित कायदयांतील तरतुदींनुसार शिक्षेस पात्र राहील.

४)उपरोक्त सोशल मिडीया/ एसएमएस/ व्हॉट्सअॅप/ फेसबुक/ व्टिटर/ टिकटॉक/ हॅलो/ टेलीग्राम अथवा इतर कोणत्याही सोशल नेटवर्किंग प्लॅटफॉर्मचे ग्रुप अॅडमिन तसेच वैदयकीयरित्या सोशल मिडीया वापरणारे व्यक्ती यांना प्रत्येकांस आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालये यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांच्या सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक ३१.०७.२०२० रोजी दिलेला आहे.**

**ठिकाण** :- पिंपरी चिंचवड
**दिनांक** :- ३१.०७.२०२०

पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner